(७) सातवी – १९८०-८४
(८) आठवी – १९८४-८९
(९) नववी – १९८९-९१
(१०) दहावी – १९९१-९६
(११) अकरावी १९९६-९७
(१२) बारावी १९९८-९९
(१३) तेरावी १९९९-२००४
(१४) चौदावी २००४-२००९
(१५) पंधरावी २००९-२०१४

सोळावी लोकसभा सध्या – अस्तित्वात २०१४ पासून.

# घटक :१७ संसदीय समित्या

* गृहाने निवडलेली किंवा सभापती किंवा अध्यक्षाने नामनिर्देशित केलेली असते.
* सभापती / अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली काम
* समिती सभागृह / सभापती / अध्यक्ष यांना अहवाल सादर करते.

प्रकार दोन : १) स्थायी समिती २) अस्थायी समिती. — (स्थायी / तात्पुरत्या)
↳ दरवर्षी किंवा ठराविक काळाने स्थापन केल्या जातात.

स्थायी समिती : सहा प्रकार.

① वित्तीय समित्या : १) लोकलेखा समिती
२) अंदाज समिती
३) सार्व. उपक्रम समिती.

② विभागीय स्थायी समित्या (२४)

③ चौकशी समित्या १) आवेदन समिती
२) विशेषाधिकार समिती
३) नितीमत्ते समिती.

④ परिक्षण व नियंत्रण समित्या

⑤ दैनंदिन कामकाज समित्या.

⑥ सेवा समित्या.

## * लोकलेखा समिती

भारत सरकार कायदा १९१९ नुसार – १९२१ मध्ये स्थापना.
सदस्य - २२ (लोकसभेतील १५ व राज्य सभेतील ७ सदस्य)
निवड - संसदेकडून (एकल संक्रमणीय प्रमाणशीर मतदान तत्त्व)
कार्यकाळ - १ वर्ष.
मंत्री सदस्य नसतो
सभापती अध्यक्षांची नियुक्ती करतात. -१९६६-६७ पर्यंत सत्ताधारी पक्षाचा त्यानंतर विरोधीपक्षाचा
काम ⇒ भारताच्या नियंत्रक व महालेखापरिक्षकाच्या लेखा परिक्षण अहवालाचे परिक्षण करणे

## * अंदाज समिती

स्थापना -१९५० मध्ये जॉन मथाई (तत्कालीन अर्थमंत्री) यांच्या शिफारशीने

Scanned by CamScanner

सुरुवातीला २५ सदस्य - १९५६ पासून ३० सदस्य.
सर्व सदस्य फक्त लोकसभेतील.
कार्यकाळ - एक वर्ष
निवड - एकल संक्रमणीय मतदान पद्धती ... सदस्यांकडून
मंत्री निवडला जात नाही.
एकाची अध्यक्षपदी नियुक्ती - सत्ताधारी पक्षाच्या.
काम ⇒ अर्थसंकल्पात केलेल्या अंदाजाचे परिक्षण करून सार्वजनिक खर्चात बचत करण्यासाठी उपाययोजना सुचविणे हे समितीचे काम.

## सार्वजनिक उपक्रम समिती

स्थापना ⇒ कृष्ण मेनन समितीच्या शिफारशीनुसार - १९६४ मध्ये
सुरुवातीला १५ सदस्य (१० + ५)
१९७४ पासून २२ सदस्य (१५ + ७)
संसदेतून - प्रमाणशीर प्रतिनिधीत्व एकल संक्रमणीय मतदान तत्व
कार्यकाल १ वर्ष
मंत्री निवडला जावू शकत नाही.
सभापती - लोकसभेच्या सदस्याची अध्यक्षपदी नियुक्ती (राज्यसभेच्या नाही)
काम : सार्वजनिक उपक्रमाबाबतच्या लेखा परिक्षण अहवालाचे अध्ययन करणे.

## चौकशी समित्या

① **आवेदन समिती :-**
विधेयके आणि सार्व मुद्याच्या आवेदनाचे परिक्षण
लोकसभेच्या आवेदन समितीत १५ तर राज्यसभेच्या समितीत १० सदस्य.

② **विशेषाधिकार समिती**
अर्धन्यायिक स्वरुप - गृहाच्या व सदस्यांच्या विशेषाधिकाराच्या उल्लंघना विषयीच्या दाव्यांचे परिक्षण.
लोकसभेच्या समितीत १५ तर राज्यसभेच्या समितीत १० सदस्य.

③ **नितीतत्वे समिती**
स्थापना राज्यसभेत १९९७ तर लोकसभेत २००० मध्ये.
संसद सदस्यांच्या आचार संहितेची अंमलबजावणी.

## परिक्षण व नियंत्रण समित्या

① **सरकारी आश्वासने समिती :** स्थापना - १९५३
मंत्र्यांनी दिलेली आश्वासने, वचने व ग्वाही यांचे परिक्षण करणे आणि ती किती प्रमाणात पूर्ण करण्यात आली यावर अहवाल सादर करणे.
लोकसभेच्या समितीत १५ तर राज्यसभेच्या १० -

Scanned by CamScanner

② दुय्यम कायद्यासंबंधी समिती :

स्थापना - १९५३ - सदस्य - दोन्ही गृहात प्रत्येकी १५

संसदेने / घटनेने सोपविलेल्या अधिकारानुसार कायदे, नियम, उपनियम बनविले जातात किंवा नाही याचे परिक्षण.

③ सादर केलेल्या कागदपत्राबाबत समिती :

स्थापना - १९७५ - लोकसभेची समिती १५ सदस्य राज्यसभेच्या १० सदस्य.

गृहात मंत्र्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे परिक्षण.

④ अनु.जाती / जमाती यांच्या कल्याणासाठी समिती.

सदस्य ३० ( लोकसभा = २० व राज्यसभा १० )

⇒ SC/ST साठीचा राष्ट्रीय आयोग यावर ( अहवाल ) विचारविनिमय.

⇒ SC/ST कल्याणकारी बाबींचे परिक्षण

महिला सबलीकरण समिती

स्थापना १९९७ सदस्य ३० ( २० + १० )

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अहवालावर विचारविनिमय करते.

लाभाच्या पदाबाबत संयुक्त समिती

सदस्य - १५ ( १० + ५ )

लाभाची पदे व त्यानुसार पात्र / अपात्र संदर्भात शिफारस करते.

गृहाच्या दैनंदिन कामकाजाबाबत समित्या

① कामकाज सल्लागार समिती ⇒

गृहातील कामकाज व वेळापत्रक याचे नियमन.

लोकसभेत अध्यक्ष धरुन १५ सदस्य राज्यसभेत अध्यक्ष धरुन ११ सदस्य.

② खाजगी सदस्यांची विधेयके व ठराव समिती ⇒

खाजगी सदस्यांनी सादर केलेल्या विधेयकाचे व ठरावाचे वर्गीकरण करुन त्यावर चर्चेसाठी वेळ नेमून देते.

फक्त लोकसभेची विशेष समिती - उपसभापती अध्यक्ष धरुन १५ सदस्य.

राज्यसभेत अशी समिती नाही. ( राज्यसभेत हे काम कामकाज सल्लागार समिती करते. )

③ नियम समिती

कामकाजाची प्रक्रिया व पद्धती यावर विचारविनिमय

गृहाच्या नियमामध्ये दुरुस्ती किंवा नवीन नियमांची शिफारस

लोकसभेत - अध्यक्ष धरुन १५ तर राज्यसभेत अध्यक्ष धरुन १६ सदस्य.

④ सदस्यांच्या अनुपस्थिती संबंधी समिती : - सदस्य १५

अनुपस्थित राहण्यासंबंधीच्या अर्जाबाबत विचार - विनाअनुमती ६० किंवा त्यापेक्षा अधिक दिवस अनुपस्थित असलेल्या सदस्यांच्या बाबींचे परिक्षण - फक्त लोकसभेची

Scanned by CamScanner

२३

## गृह सेवा समित्या

① सर्वसाधारण उद्देश्ये समिती:

कोणत्याही समितीच्या अधिकारक्षेत्रात न येणाऱ्या व्यवहारासंबंधी.

सदस्य. ① गृहाचा सभापती / अध्यक्ष —— अध्यक्ष
② उपसभापती / उपाध्यक्ष —— सदस्य
③ सभापती / उपाध्यक्ष पॅनेलचे —— सदस्य.
④ सर्व स्थायी समित्यांचे अध्यक्ष —— सदस्य
⑤ मान्यताप्राप्त पक्षांचे व गटांचे नेते —— सदस्य
⑥ गृहाचा प्रमुख नामनिर्देशित करील ते —— सदस्य.

② निवास समिती

सदस्यांच्या निवासाची सोय, दिल्लीत त्यांच्या घरी व वसतीगृहात पुरविल्या जाणाऱ्या अन्न, वैद्यकिय मदत इ. मुद्दे हाताळते.

③ ग्रंथालय समिती

पुस्तके पुरविणे – एकूण सदस्य ९ (६+३)

④ वेतन व भत्ते याबाबत संयुक्त समिती.

सदस्यांचे वेतन व भत्ते व निवृत्ती वेतन कायदा १९५४ अनुसार स्थापना
सदस्य १५ (१०+५)

## सल्लागार समित्या

⇒ विविध विभाग / मंत्रालयाशी संलग्न.
⇒ दोन्ही गृहातील सदस्य.
⇒ राज्यमंत्री संबंधीत सल्लागार समितीच्या अध्यक्षपदी.
⇒ सरकारच्या धोरणासंबंधी अनौपचारिक चर्चेसाठी व्यासपीठ.
⇒ सदस्यसंख्या किमान १० व कमाल ३० (सदस्यांसह एकत्रित)
⇒ लोकसभा विसर्जीत झाल्यावर या समित्या विसर्जित होतात.
⇒ २०१४ मध्ये ३५ सल्लागार समित्यांची स्थापना.

Scanned by CamScanner